Swadeshi

Swadeshi
INDUSTRIES & LEASING LTD.
CIN NO. L45209 MH 1983 PLC 031246

Ref :

Date :

Date: 18th January, 2024

To,
The Secretary
BSE Limited
Corporate Relations Department,
P. J. Towers, Dalal Street,
Mumbai-400001

Dear Sir,

Sub: Compliance under Regulation 30 & 47of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015

Ref: Scrip Code- **506863**
**Dear Sir,**

Pursuant to Regulation 30 & 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Please find enclosed public notice published on 18th January, 2024 in English Newspaper Financial Express and Mumbai Mitra Marathi newspaper informing about the Board meeting to be held on 24th January 2024 inter alia to approve the unaudited financial results for the Third quarter ended 31st December, 2023.

Further, in pursuant of Regulation 30(4) read with Schedule III(A)(12), please find enclosed herewith the copy of newspaper article published in the above stated newspapers.

Kindly take the same on your Record.

Thanking you,

Yours faithfully,
For**SWADESHI INDUSTRIES AND LEASING LIMITED**

Gaurav Jain
Managing Director
DIN -06794973

Shop no.117, 1st Floor, V Mall, Off W.E. Highway, Near Sai Hospital, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai 400101
Email: Compliance@Swadeshiglobal.Com, Swadeshiindltd@Gmail.Com Web: Site: Swadeshiglobal.Com

# SWADESHI INDUSTRIES AND LEASING LIMITED

117, V. mall, Thakur Complex,
Kandivali East Mumbai 400101.
Email: Compliance@swadeshiglobal.com
Website: www.swadeshiglobal.com.

## NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, NOTICE is hereby given that a meeting of the Board of Directors of Company will be held on Wednesday, 24th January, 2024, inter alia to consider and approve the Un audited Financial Results for the Third Quarter and nine month ended 31st December 2023.Further as per the "Code of Conduct" formed under the Securities and Exchange Board of India (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015; the trading window has been closed from 01st January, 2024.till forty eight hours after the date of declaration of results for Directors, KMP Officers and Designated Employees, and their immediate relatives.

This information is also available on Company's website at www.Swadeshiglobal.comand also on Stock Exchanges Website at www.bseindia.com

**For Swadeshi Industries and Leasing Limited**
**Sd/-**
**Gaurav Jain**
**Managing Director**
**(DIN: 06794973)**

**Date: 17th January 2024**

FINANCIAL EXPRE
READ TO

# पाण्याच्या संरक्षणासाठी पालिकेला केंद्राकडून ९९० कोटींचे अनुदान

■ प्रतिनिधी, मुंबई

पिण्याच्या पाण्याचे संरक्षण, पुरवठा व व्यवस्थापन तसेच घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी मुंबई महापालिकेला केंद्र सरकारकडून ९९० कोटींचे अनुदान मिळाले आहे. यामुळे पाण्याचे संरक्षण करत मुंबईकरांना शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा करणे अधिकाधिक शक्य होते, असे पालिकेच्या जल विभागाकडून सांगण्यात आले. मुंबई आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून मुंबई नेहमीच दहशतवादीच्या निशाण्यावर आहे. त्यामुळे मुंबईच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. तसेच मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे विस्तारले आहे. तसेच सुरक्षारक्षक व पोलिसांचा २४ तास खडा पहारा असतो. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रातील पाण्याच्या सुरक्षेसाठी आता केंद्र सरकारने धाव घेतली असून पाण्याचे संरक्षण व व्यवस्थापनासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे.

मुंबईत दररोज ६,३०० मेट्रिक टन कचरा जमा होतो आणि कांजूर व देवनार डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. दररोज जमा होणारा कचरा डम्पिंग ग्राऊंडवर पोहोचवण्यासाठी मुंबई महापालिकेची ३२२ तर कंत्राटी १,२६४ वाहने दिवसरात्र सेवा देत असतात. त्यामुळे दररोज जमा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते.



२०३० पर्यंत कचरामुक्त मुंबईचे उद्दिष्ट

स्वच्छ व सुंदर मुंबईसाठी २०३० पर्यंत कचरामुक्त मुंबईचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. मुंबई महापालिकेच्या कचरामुक्तीच्या संकल्पास केंद्र सरकारने हातभार लावला असून घनकचरा व्यवस्थापनासाठी आणि पाण्याच्या संरक्षण व व्यवस्थापनासाठी एकूण ९९० कोटी रुपयांचे अनुदान पालिकेला दिल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. मुंबईची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात पोहोचली असून भविष्यात पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता, पाण्याचे संरक्षण करणे काळाची गरज आहे. १७५ किलोमीटर अंतरावरून मोडकसागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा, विहार व तुळशी या सात धरणांतून मुंबईची रोजची तहान भागवली जाते. मुंबईला दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईकरांना शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा यासाठी पांजरापूर शुद्धीकरण प्रकल्पात रोज १३६५ दशलक्ष लिटर, भांडुप संकुल रोज - २८१० दशलक्ष लिटर आणि विहार तलावात रोज ९० दशलक्ष लिटर आणि तुळशी तलावात रोज १८ दशलक्ष लिटर पाणी आणले जाते.

## शॉर्ट न्युज

### सरकारने विंडफॉल टॅक्स कमी केल्याने पेट्रोल-डिझेल स्वस्त होणार?

■ प्रतिनिधी, मुंबई

केंद्र सरकारने देशांतर्गत उत्पादित खनिज तेलावरील विंडफॉल टॅक्स कमी केला आहे यामुळे तेल कंपन्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासंबंधीची अधिसूचना सोमवारी जारी करण्यात आली आहे. या अधिसूचनेनुसार, कच्च्या तेलावरील विंडफॉल कर आता १७०० रुपये प्रति टन इतका खाली आला आहे. पूर्वी तो प्रतिटन २३०० रुपये होता. नवीन दर १६ जानेवारीपासून लागू होणार आहेत. यापूर्वी २ जानेवारी रोजी सरकारने कच्च्या तेलावरील विंडफॉल कर १३०० रुपये प्रति टन वरून २३०० रुपये प्रति टन केला होता. विंडफॉल टॅक्समध्ये कपात केल्यानंतरही त्याचा परिणाम पेट्रोल आणि डिझेलच्या दरांवर दिसण्याची शक्यता नाही. कारण हा तेल कंपन्यांच्या नफ्यावर कर आहे. अशा स्थितीत त्याचा फायदा जनतेला सध्या तरी होताना दिसत नाही. मात्र, विंडफॉल टॅक्स कमी करून सरकारने तेल विपणन कंपन्यांना मोठा दिलासा दिला आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतात पहिल्यांदा विंडफॉल टॅक्स जुलै २०२२ मध्ये लागू करण्यात आला होता. जेव्हा एखादा उद्योग अनपेक्षित नफा कमावतो आणि हे काही असामान्य घटनेमुळे होते, जसे की युद्धादरम्यान तेलाच्या किमती वाढल्या, तेव्हा हा कर वाढलेल्या नफ्यावर लादला जातो.

### ५ फेब्रुवारीला पालिकेचे निवडणूक महाबजेट !

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईचे सौंदर्यीकरण, भूमिगत मार्केट, कोळीवाड्यांचा विकास, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, समुद्राचे खारे पाणी गोडे करणे, वर्सोवा-दहिसर, दहिसर-भाईंदर उन्नत मार्ग अशा विविध प्रकल्पांना नवीन वर्षात सुरुवात होणार आहे. या प्रकल्पासाठी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य, शिक्षण यासाठी भरीव तरतूद करण्यात येणार असली तरी आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून २०२४-२५ चा अर्थसंकल्प असणार आहे. त्यामुळे मालमत्ता कर व पाणीपट्टीत वाढ होणार नसल्याचे पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, ५ फेब्रुवारीला यंदाचा अर्थसंकल्प सादर होणार असून प्रशासकीय राजवटीत सलग दुसऱ्यांदा प्रशासक म्हणून पालिका आयुक्त डॉ. इक्बालसिंह चहल अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सन २०२३-२४ चा ५२ हजार ६१९.०७ कोटींचा विक्रमी अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता.

### तीन महिन्यांची मुदत देऊनही मराठी पाट्यांबाबत उदासिनता !

# मुंबईत ९,००० दुकानांवर अद्याप मराठी पाटी नाही

■ प्रतिनिधी, मुंबई

दुकाने आणि आस्थापनांवरील पाट्या मराठीत असायला हव्यात, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर तसेच पाट्या मराठीत करण्यासाठी पालिकेने तीन महिन्यांची मुदत देऊनही पाट्या न लावणाऱ्या दोन हजार दुकानदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे.

पाट्या मराठीत लावल्या आहेत की नाही याची तपासणी करण्याचे काम पालिकेने नोव्हेंबर २०२३ सालापासून सुरू केले. रोज दोन हजार दुकानांची तपासणी केली जात होती. महिनाभर तपासणी केल्यानंतर ७ ते ८ टक्के दुकानदारांनी पाट्या मराठीत लावल्या नसल्याचे आढळून आले होते. या दुकानदारांना त्यानंतर नोटिसा बजावण्यात आल्या. प्रती कामगार दोन हजार रुपये दंड ठोठावण्यात आला.





पालिकेची २ हजार दुकानांवर कारवाई

दंड न भरणाऱ्या दुकानदारांच्या विरोधात न्यायालयात अहवाल सादर केला जाणार आहे. पालिकेची तपासणी मोहीम ३१ जानेवारी २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यानंतर मात्र प्रत्यक्ष कायदेशीर कारवाईला सुरुवात होईल. मराठी पाट्यांच्या विरोधात व्यापाऱ्यांच्या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

अजूनही १०० टक्के पाट्या मराठीत नाहीत सुरुवातीच्या काळात पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांचे प्रमाण ७ ते ८ टक्के होते. हे प्रमाण आता दोन टक्क्यावर आले आहे. मात्र अजूनही १०० टक्के पाट्या मराठीत लागलेल्या नाहीत.





■ **एका वाक्यात फडणवीसांनी दाखवली राऊतांना जागा**

राम मंदिरावरून टीका करणाऱ्या संजय राऊतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चांगलेच सुनावले आहे. फडणवीस म्हणाले की, 'आयुष्यात मी एक गोष्ट पाळतो की, मी मुर्खांना उत्तरे देत नाही. मात्र मी इतके सांगेन की देशातील हिंदूंचा अपमान करणे बंद करा. तुमचे रामजन्मभूमी आंदोलनात कोणतेही योगदान नाही.' फडणवीस म्हणाले ते अगदी बरोबर आहे. ज्यांचे राममंदिर आंदोलनात कसलेही योगदान नाही. अशा प्रकारचे लोक असे आरोप करून स्वत:चे हसू करून घेत आहेत. तसेच कोट्यवधी हिंदूंचा अपमान करत आहेत. उबाठा सेनेने अशा प्रकारे हिंदूंचा अपमान करणे बंद करावे, असे प्रत्युतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले आहे. फडणवीस म्हणाले ते अगदी बरोबर आहे. संजय राऊत यांच्यासारख्या संपादक पदावर असणारी, पत्रकारिता करणारी व्यक्ती अफवांचा आधार घेऊन त्या आधारे वक्तव्य करत असेल तर यासारखे दुर्दैव नाही. मात्र राऊतांची आता अवस्था अशी झाली आहे की, त्यांच्या कोणत्याच कृती विषयी आश्चर्य वाटत नाही. कारण ते नैराश्याने व वैफल्यग्रस्त अवस्थेतून काही बोलतात का अशी जनमानसात चर्चा आहे.

# आता मुंबईकरांना कचरा उचलण्यासाठी मोजावे लागणार अतिरिक्त पैसे

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईकरांना आता लवकरच घराबाहेर ठेवलेला कचरा उचलून नेण्याचेही पैसे महापालिकेला मोजावे लागणार आहेत. यासाठी उपविधित बदल करण्यात येणार असून, पालिकेने प्रशासकीय प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई महापालिका कचऱ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणार असून, त्यानुसार पालिका प्रशासनाला कर वसुलीचे उद्दिष्ट दिले आहे. हा कर नागरिकांकडून वसूल केला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांकडून कमीत कमी १ ते ५ रुपये कर आकारण्याचा विचार पालिका करत आहे.

मुंबई पालिका कायदा १८८८ नुसार स्वच्छतेसाठी कचरा उचलणे हे पालिकेचे मूलभूत कर्तव्य आहे. घरोघरचा कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेमार्फत स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे. त्याचे व्यवस्थापन प्रशासनाच्या देखरेखीखाली पालिका कर्मचारी आणि ठेकेदार यांच्यामार्फत राबविले जाते. सद्य:स्थितीत संकलनासाठी पालिकेकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. मात्र कचरा व्यवस्थापनाचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून, यासाठी शुल्क आकारण्याची तयारी पालिकेने सुरू केली आहे. मात्र यामुळे अगोदरच महागाईने त्रस्त झालेल्या नागरिकांवर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडत आहे.

महापालिकडून १ ते ५ रुपये कराची तरतूद!

मनपा स्वतंत्र प्राधिकरण स्थापण करणार



# मलबार हिल जलाशयाचे भवितव्य आयआयटीच्या हाती

जलाशयाच्या पुनर्बांधणीसाठी ८ जणांची तज्ज्ञ समिती

■ प्रतिनिधी, मुंबई

मलबार हिल जलाशयासंबंधित पुनर्बांधणी किंवा दुरुस्ती नाही तर इतर बाबींच्या अनुषंगाने आयआयटी मुंबईने अंतिम अहवाल सादर करावा. संस्थेने पालिकेला सादर केलेल्या अहवालाच्या निकष, निरीक्षणांच्या आधारावरच जलाशयासंबंधित अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे पालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यासंबंधीचे पत्र पालिका प्रशासनाकडून आयआयटीला पाठविण्यात आले असून, प्राध्यापकांनी सुचविलेल्या सूचना या संस्थेच्या सूचना आणि निरीक्षणे म्हणून मानण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आपले आहे.

मलबार हिल जलाशयाच्या पुनर्बांधणीच्या निर्णयासाठी ८ जणांची तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती. आयआयटी मुंबईचे संरचना, जलशास्त्र, भूरचनाशास्त्र या विषयांचे चार तज्ज्ञ प्राध्यापक, तसेच तीन स्थानिक नागरिक व महानगरपालिका अधिकारी यांचा या समितीमध्ये समावेश होता. लवकरच ही समिती आपला अहवाल पालिकेला सादर करेल, अशी अपेक्षा आहे.



**सर्व पैलूंचा विचार करावा :** जलाशय पुनर्बांधणीच्या प्रस्तावाचे पुनरावलोकन करून योग्य कार्यपद्धती सुचविण्यासाठी भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आयआयटी) मुंबई यांनी तज्ज्ञ समितीच्या चर्चेच्या आधारे तसेच, सर्व पैलूंचा विचार करून मुंबईकर नागरिकांकडून प्राप्त झालेली पत्रे व ई-मेल विचारात घेऊन, कृतीयोग्य प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे.

**ACI INFOCOM LIMITED**

REGD OFF: 109, Dimple Arcade Asha Nagar, Thakur Complex, Kandivali East Mumbai-400101
Email: Compliance@acirealty.co.in
Website: www.acirealty.com

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, NOTICE is hereby given that a meeting of the Board of Directors of Company will be held on Wednesday, 24th January 2024, inter alia to consider and approve the Un-audited Financial Results for the Third quarter ended 31st December 2023, Further as per the "Code of Conduct" formed under the Securities and Exchange Board of India (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015; the trading window has been closed from Monday 1st January, 2024 till forty eight hours after the date of declaration of results for Directors, KMP Officers and Designated Employees, and their immediate relatives.

This information is also available on Company's website at www.acirealty.comand also on Stock Exchanges Website at www.bseindia.com

For ACI Infocom Limited
Kushal chand Jain
Managing Director
(DIN: 03545081)

Place: Mumbai
Date: 17th January, 2024

**SWADESHI INDUSTRIES AND LEASING LIMITED**

117, V. mall, Thakur Complex, Kandivali East Mumbai 400101.
Email: Compliance@swadeshiglobal.com
Website: www.swadeshiglobal.com.

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, NOTICE is hereby given that a meeting of the Board of Directors of Company will be held on Wednesday, 24th January, 2024, inter alia to consider and approve the Un audited Financial Results for the Third Quarter and nine month ended 31st December 2023.Further as per the "Code of Conduct" formed under the Securities and Exchange Board of India (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015; the trading window has been closed from 01st January, 2024.till forty eight hours after the date of declaration of results for Directors, KMP Officers and Designated Employees, and their immediate relatives.

This information is also available on Company's website at www.Swadeshiglobal.comand also on Stock Exchanges Website at www.bseindia.com

For Swadeshi Industries and Leasing Limited
Sd/-
Gaurav Jain
Managing Director
(DIN: 06794973)

Date: 17th January 2024
Place: Mumbai

# एसटीच्या मिनी वातानुकूलित गाड्या लवकरच प्रवासी सेवेत

■ प्रतिनिधी, मुंबई

एसटी महामंडळाने ताफ्यात वातानुकूलित मिनी बसगाड्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. घाट चढण्यात उपयुक्त, पर्यावरणपूरक अशा २० विद्युत बसेस लवकरच प्रवाशांच्या सेवेत रस्त्यावर धावणार आहेत. या बस ठाणे-१ आगारामार्फत ठाणे-नाशिक, बोरिवली-नाशिक दरम्यान लवकरच सुरू होणार असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले. दरम्यान, वातानुकूलित इलेक्ट्रिक बस एकदा चार्ज केल्यानंतर २०० किमी सुसाट धावणार आहे.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात सध्या १४ हजार ६० बसेस आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यात प्रवाशांना इच्छित स्थळी पोहोचवण्याची जबाबदारी एसटीचे चालक व वाहक पार पाडतात. परंतु घाट चढण्यात अनेक वेळा एसटीच्या मोठ्या गाड्या कमी पडतात. आतापर्यंत एसटीच्या ताफ्यात डिझेल बसगाड्या होत्या.



ठाणे-नाशिक, बोरिवली-नाशिक दरम्यान धावणार

मात्र आता एसटी महामंडळाने इलेक्ट्रिक बसेस घेण्यास प्राधान्य दिले असून ९ मीटरच्या २ हजार ३०० मिनी बसगाड्या व १२ मीटरच्या मोठ्या २ हजार ८५० गाड्या घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी १०० मोठ्या बसेस दाखल झाल्या असून त्या दादर-पुणे, बोरिवली-पुणे तसेच ठाणे-पुणे या मार्गावर धावत आहेत तर ९ मीटरच्या २ हजार ३०० मिनी बसेसपैकी पहिल्या २० बसेस एसटीच्या ताफ्यात ठाणे-१ आगारात दाखल झाल्या आहेत. या बसगाड्यात ३५ आरामदायक आसने असून लवकरच या २० मिनी बसेस पुढील दोन-चार दिवसात प्रवासी सेवेत रस्त्यावर धावतील, असे एसटीकडून सांगण्यात आले.

मुख्य कार्यालय,
विरार, विरार (पूर्व),
ता. वसई,
जि. पालघर,
पिन- ४०१ ३०५

दूरध्वनी : ०२५०-६६३००००/२५२७१०८
टोल फ्री क्र. : १८००२३३४३५३
ई-मेल : vasaivirarcorporation&yahoo.com
जा.क्र. : वविशम/मु. विद्युत/१११/२०२४
दिनांक : १७/०१/२०२४

**ई-निविदा सूचना क्र. २३ (२०२३-२४)**

वसई विरार शहर महानगरपालिका, कार्यक्षेत्रातील नालासोपारा विरार लिंकरोडवरील विवा जांगिडकडे जाणाऱ्या नव्याने विकसीत केलेल्या रस्त्यावर नव्याने सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणे कामाकरीता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सुचना व निविदा प्रपत्र http://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १८/०१/२०२४ ते दि. २५/०१/२०२४ रोजी उपलब्ध आहे. ई-निविदा http://mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. १८/०१/२०२४ ते दि. २५/०१/२०२४ रोजी दु. ३.०० पर्यंत ऑनलाईन स्विकारण्यात येतील.

सही/-
(अमोल जाधव)
प्र. कार्यकारी अभियंता (विद्युत)
वसई-विरार शहर महानगरपालिका

# अटल सेतूमुळे संपादित जमिनींचे मालक होणार मालामाल !

राज्य सरकारला मोजावे लागणार कोट्यवधी रूपये

■ प्रतिनिधी, मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन झालेल्या अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू' (अटल सेतू) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या ७ हेक्टर ५१ गुंठे जमिनीबाबत राज्य सरकारला मंगळवारी झटका दिला असून, यामुळे जमीन मालकांना भरपाईपोटी कोट्यवधी रुपये मोजावे लागणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील जासई गावातील या जमिनीबाबतच्या भूसंपादन भरपाईचा निवाडा मुदतीत जारी केला नसल्याने ती प्रक्रिया व्यपगत झाल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच जमीन मालकांना भूसंपादन, पुनर्वसन व पुन:स्थापना प्रक्रियेतील पारदर्शकता व वाजवी भरपाईचा हक्क, २०१३ या कायद्यांतर्गत लवकरात लवकर आर्थिक भरपाई देण्याचा आदेश दिला आहे. परिणामी जमीन मालकांना भरपाईपोटी देण्यासाठी सरकारला कोट्यवधी रुपये मोजावे लागणार आहेत. सिडकोने हा महत्वकांक्षी प्रकल्प प्रस्तावित केल्यानंतर तो राबवण्याची जबाबदारी एमएमआरडीएवर सोपवण्यात आली होती. सिडकोने जासई गावातील १५ हेक्टरहून अधिक जमीन संपादित करण्याचे ठरवल्यानंतर त्यापैकी सुमारे ८.६६ हेक्टर जमीन करारांद्वारे घेतली. तर उर्वरीत ७ हेक्टर ५१ गुंठे जमिनीबाबत उपजिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन कायदा, १८९४ या जुन्या कायद्याद्वारे भूसंपादन प्रक्रिया सुरू केली. त्याबाबतची अधिसूचना २ जुलै, २००९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार विविध जमीन मालकांना नोटीस देण्यात आली. तसेच कायद्यातील कलम १७ (तातडीची बाब) लावण्यात आल्याने कलम ५-अ अन्वये चौकशीची प्रक्रिया झाली नाही. त्यानंतर विविध प्रक्रिया होऊन २२ डिसेंबर, २०१२ रोजी कलम ६अन्वये अंतिम घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**"ड"-निवीदा सूचनाक्र.२५/२०२३-२४.**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,२ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१. दुरध्वनीक्रमांक-०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी सा.बां. विभाग अनुभवी कंत्राट दारांकडुन **खुली** निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई, यांचे कार्यालयातून **दिनांक १९/०१/२०२४ ते २५/०१/२०२४ सायंकाळी १७.०० पर्यंत देण्यांत येतील.** भरून पाठविलेल्या सिलबंद निविदा **दिनांक २९ /०१/२०२४** रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितकिमत | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचीकालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदानमुन्याचीकिमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | गोकुळदास तेजपाल रुग्णालय येथील ८ व्या व १०व्या मजल्यावरील सार्वजनिक आरोग्य विभाग नुतनीकरण कामासाठी वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन यांची नेमणूक करणे बाबत. (IUGT-438) | रु. ४,११,५००/- | रु.४,२००/- | ३ - महिने | डी | रु. ५९० /- (जी.एस.टी.आकारासह) |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई, फोर्ट, मुंबई येथील बांधकाम भवन, या प्रशासकीय इमारतीत सार्वजनिक बांधकाम कार्यालयांतर्गत खुर्च्या व विविध प्रकारच्या फर्निचरचा पुरवठा करणे बाबत. (IUBB-203) | रु.८,४६,८९२/- | रु.८,५००/- | ३ - महिने | डी | रु. ५९० /- (जी.एस.टी.आकारासह) |
| ३. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, मुंबई फोर्ट येथील बांधकाम भवन इमारतीतील ५व्या मजल्यावर पीव्हीसी फ्लोअरिंग, लाकडी फ्लोअरिंग, सेंटर टेबल, सोफा सेट आणि खुर्च्या पुरवठा करणे बाबत. (IUBB-204) | रु.८,४२,६८९/- | रु.८,५००/- | ३ - महिने | डी | रु. ५९० /- (जी.एस.टी.आकारासह) |
| ४. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, मुंबई फोर्ट येथील बांधकाम भवन इमारतीतील लोखंडी रैक चा पुरवठा करणे बाबत. (IUBB-904) | रु.८,१४,७२४/- | रु.८,२००/- | ३ - महिने | डी | रु. ५९० /- (जी.एस.टी.आकारासह) |
| ५. | गोकुलदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत मुंबई ९ व्या मजल्यावरील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे बी विंग चे नुतनीकरण कामासाठी खाजगी वास्तुविशारद यांची नेमणूक करणेबाबत. (IUGT-356) | रु.९,०२,५००/- | रु.९,१००/- | ३ - महिने | डी | रु. ५९० /- (जी.एस.टी.आकारासह) |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई, यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करविण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ड-निविदा/ २५२ /२०२४.
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
एकात्मिकृतघटक, (सा.बां.) विभाग,बांधकाम भवन,२ रा मजला,
२५,मर्झबान पथ, फोर्ट,मुंबई-४०० ००१.
दुरध्वनीक्र. २२०१६९७४/२२०१६९७६.
दिनांक :- १५ /०१/२०२४.

डी.जी.आय.पी.आर./६८७४/२०२३-२४

सही/-
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग
मुंबई.